| MHBI170000182022 | दाखल दिनांक | : ०७.०१.२०२२ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : १०.०१.२०२२ |
| | निकाल दिनांक | : १३.०८.२०२६ |
| | कालावधी | : ०४ व ०७ म ०६ दि |

| | **निशाणी क्र.३६** |
|---|---|
| **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय वडवणी, ता. वडवणी, जि. बीड.**<br>(पिठासीन अधिकारी श्री विष्णु द. गिते)<br>न्यायनिर्णयाचा दिनांक १३/०८/२०२६<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२/२०२२** | |
| | अपराध क्रमांक : २५०/२०२१<br>पोलीस स्टेशन : वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| फिर्यादी | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, वडवणी. |
| फिर्यादीतर्फे वकिल | श्री. ए. डी. साखरे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| आरोपी क्र.२ | गणेश राजाभाऊ कुरकुटे,<br>वय ३२ वर्षे, राहणार – काळा हनुमान मंदिर,<br>वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| आरोपीतर्फे वकिल | श्री. पी. एस. उजगरे. |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७.१२.२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | २७.१२.२०२१ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०७.०१.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १७.०८.२०२४ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | ०९.०१.२०२६ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १३.०८.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

आरोपीची सविस्तर माहिती.

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | गणेश कुरकुटे | २८.१२.२१ रोजी नोटीस | -- | महाराष्ट्र जुगार अधिनियमचे कलम १२-अ | निर्दोष सुटका १३.०८.२०२६ | -- | -- |

सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

अ. सरकारी साक्षीदारः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | गोपाल दगडु सपकाळ (निशाणी क्र.२३) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | कृष्णा सिताराम धरपडे (निशाणी क्र.२६) | पंच साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

अ. सरकार पक्षातर्फेः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| ०१ | १६ | दोषारोप |
| ०२ | २४ | फिर्याद |
| ०३ | २५ | प्रथम खबर अहवाल |
| ०४ | ३५ | आरोपीचे सी.आर.पी.सी. कलम ३१३ नुसार निवेदन |

ड. जप्त वस्तुंचे वर्णनः-

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| ०१ | --- | नगदी रक्कम रु.३१५०/- आणि जुगार खेळण्याचे साहित्य. |

## न्यायनिर्णय
## (जाहीर दिनांक १३/०८/२०२६)

**१.** प्रस्तुतचा खटला आरोपींविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम, चे कलम १२–अ या अपराधासाठी चालविण्यात आला.

**२.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम, चे कलम १२–अ या गुन्ह्याकरीता दोषारोप (नि.क्र.१६) ठेवला, तो त्यास मराठी भाषेत वाचवून व समजावून सांगीतला. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन (नि.क्र.३५) प्रमाणे नोंदविले.

**३.** साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पाहता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २७.१२.२०२१ रोजी १९.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी हा मौजे वडवणी, ता. वडवणी येथील चिंचवण रोड येथे बेकायदेशीररित्या 'मिलन नाईट' नावाचा जुगार स्वतःच्या फायद्यासाठी पैशावर खेळत आणि खेळवित असताना मिळून आला ? | **नकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**प्रश्ने क्रमांक १ व २ करीताः**–

**४.** आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकारपक्षातर्फे एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले आहेत. या व्यतिरीक्त लेखी फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा/पत्रक इत्यादी कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

**५.** फिर्यादी गोपाल सपकाळ (सा.क्र.१) यांच्या कथनाप्रमाणे दि.२७.१२.२०२१ रोजी त्यांना आरोपी क्र.१ प्रल्हाद नागरगोजे हा चिंचवण रोड

वडवणी येथे मिलन नाईट नावाचा जुगार खेळत व खेळवित असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्यानुसार साक्षीदार स्वतः, इतर कर्मचारी आणि दोन पंच असे सर्वजण १९.०० वाजता बातमी मिळालेल्या ठिकाणी गेले असता त्यांना पाहुन तेथील सर्व लोक पळुन गेले. त्यांनी पंचासमक्ष आरोपी प्रल्हाद याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यामध्ये रोख रक्कम रु.३१५०/– आणि मिलन नाईट खेळण्याचा चार्ट मिळुन आला. सदर मुद्देमाल दोन पंचासमक्ष जप्त करुन श्री.जायभाय यांनी त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर प्रल्हाद नागरगोजे यास सदर जुगारतुन मिळणारी रक्कम कोणास देतो अशी विचारणा केली असता त्याने गणेश कुरकुटे यांना १० टक्के प्रमाणे देतो असे सांगितले. त्यामुळे साक्षीदार यांनी प्रल्हाद नागरगोजे आणि गणेश कुरकुटे यांच्या विरुध्द तक्रार (नि.क्र.२४ व २५) दाखल केली.

६. फिर्यादी गोपाल सपकाळ (सा.क्र.१) यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, दिनांक २७.११.२०२१ रोजीची फिर्यादी दाखल करण्यापुर्वी ते गणेश कुरकुटे नावाच्या व्यक्तीला ओळखत नव्हते तसेच त्यांनी गणेश कुरकुटे यांना पाहिलेले नव्हते. अभियोगपक्षाच्या कथनानुसार आरोपी प्रल्हाद व इतर काही लोक चिंचवण रोड येथे मिलन नाईट नावाचा जुगार खेळत होते. जुगार खेळणारे इतर लोक त्यांना पाहून पळून गेले असल्याचे कथन केलेले आहे, परंतु पळुन गेलेल्या लोकांना पकडण्याचा प्रयत्न केला होता किंवा नाही तसेच त्या लोकांची नावे, संख्या किंवा इतर कोणतीही माहिती न्यायालयासमक्ष आली नसल्याचे दिसून येत आहे. केवळ प्रल्हाद नागरगोजे यांनी गणेश कुरकुटे यांचे नाव सांगितल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, परंतु त्या अनुषंगाने कोणताही तपास केला आहे, असे दिसून येत नाही.

७. कृष्णा धरपडे (सा.क्र.२) हा पंच साक्षीदार असून त्यांनी सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, ते ज्या हॉटेलमध्ये काम करतात त्याच हॉटेलमध्ये दि.२७.१२.२०२१ रोजी त्यांची पोलीसांसोबत भेट झाली होती. त्यावेळी, पोलीसांनी काही कागदांवर त्यांच्या सह्या घेतल्या होत्या. साक्षीदाराने पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली, परंतु त्यातील मजकूराविषयी माहिती नसल्याचे कथन केले आहे. पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. याउलट साक्षीदाराने प्रकरणातील मुद्देमाल पोलीसांनी त्यांच्यासमक्ष जप्त केला आहे तसेच त्याचा पंचनामा देखील त्यांच्यासमक्ष केलेला

आहे याबाबी स्पष्टपणे नाकारले आहे. सदर प्रकरणामध्ये रोख रक्कम रु.३१५०/– आणि इतर मुद्देमाल जप्त केलेला आहे असे अभिलेखावर आलेले आहे, परंतु पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे जप्त केलेली रक्कम तसेच इतर मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केलेला आहे, ही बाब सिद्ध होऊ शकलेली नाही. याउपरही पळुन जाणारे लोक कोण होते आणि ते का पळून गेले, या विषयी स्पष्टीकरण येण्यासाठी तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्षास यश आलेले नाही.

८. सदरहू प्रकरण मुंबई जुगार अधिनियमाचे कलम १२–अ अंतर्गत एकुण दोन आरोपींविरुद्ध दाखल करण्यात आलेले आहे. या प्रकरणमध्ये आरोपी क्र.१ प्रल्हाद नागरगोजे याने गुन्हा कबुल केलेला असल्यामुळे त्याच्या विरुद्ध सदरील प्रकरण दि.१२.०३.२०२२ रोजी बंद करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रस्तुत प्रकरण आरोपी क्र.२ गणेश कुरकुटे याच्या विरुद्ध चालविण्यात आलेले आहे. आरोपी नामे गणेश कुरकुटे यांच्या विरुद्ध निश्चीत केलेले दोषारोप सिद्ध झालेले नसल्यामुळे सदर आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे ;

## आ दे श

१) आरोपी क्र.२ **गणेश राजाभाऊ कुरकुटे** यास फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अन्वये मुंबई जुगार अधिनियमाचे कलम १२–अ मधील आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) जप्त नगदी रक्कम रु.३१५०/– यावर कोणीही हक्क सांगितलेला नसल्याने सदर रक्कम सरकार जमा करावी. इतर काही रोख रक्कम आढळुन आल्यास ती सरकार जमा करण्यात यावी.

३) जप्त मुद्देमाल जुगार खेळण्याचे साहित्य हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर त्याचा नाश करण्यात यावा. तसेच, इतर काही मुद्देमाल असल्याच त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

४) आरोपीचे जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहे.

५) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रु.७,५००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.08.13 17:58:54 +0530

**दिनांक : १३/०८/२०२६.** **( विष्णु द. गिते )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी,**
**जि. बीड.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी व फौजदारी न्यायाधीश,<br>वडवणी, जि. बीड. |
| लघुलेखकाचे नाव | :– | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :– | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १३/०८/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १३/०८/२०२६ |